आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

बुधवार, दिनांक : २ ऑक्टोबर, २०२४

1. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त त्यांना देशभरात अभिवादन.

2. निरंतर प्रयत्न करुनच आपण स्वच्छ भारताचं उद्दीष्ट पूर्ण करु शकतो- स्वच्छता ही सेवा अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन.

3. राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीच्या सामग्रीमध्ये ८० लाख टन विलगीकृत कचऱ्याचा वापर केल्याने स्वच्छता अभियानाला हातभार लागल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं नागपूरात प्रतिपादन.

**4.** पंतप्रधानांच्या हस्ते झारखंडमधील हजारीबाग येथे सुमारे **550** जिल्ह्यांतील **63,000** आदिवासी गावांना लाभ देण्यासाठी धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानाचा प्रारंभ.

******

गांधी जयंती अभिवादन

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे दुसरे पंतप्रधान, लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त, देश आज त्यांना आदरांजली वाहत आहे. महात्मा गांधी यांची आज, १५५वी जयंती असून, त्यानिमित्त देशासह परदेशातही विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि केंद्रीय मंत्र्यांनी, नवी दिल्लीतल्या महात्मा गांधींच्या राजघाट इथल्या समाधीस्थळी पुष्पांजली अर्पण केली.

त्यानंतर त्यांनी माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या १२०व्या जयंती निमित्त विजयघाट इथल्या समाधीवर आदरांजली अर्पण केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, गांधी जयंती निमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व नागरिकांनी सत्य, अहिंसा, प्रेम आणि सचोटी ही मूल्यं, आत्मसात करून महात्मा गांधींच्या स्वप्नातला भारत प्रत्यक्षात साकारण्याचा तसंच, देश आणि समाजाच्या विकासासाठी सातत्यानं प्रयत्न करण्याचा संकल्प करूया असं आवाहन, राष्ट्रपतींनी केलं आहे.

सत्य, सद्भावना आणि समानता या मूल्यांचा अंगिकार करणाऱ्या, महात्मा गांधींच्या आदर्शांमुळ देशाला कायम प्रेरणा मिळत राहील असं, पंतप्रधानांनी म्हटलं असून, लाल बहादूर शास्त्री यांनी आपलं आयुष्य, शेतकरी, सैनिक आणि देशाभिमानासाठी, समर्पित केलं असं म्हटलं आहे.

महात्मा गांधी जयंती निमित्त, राज्यपाल, सी.पी.राधाकृष्णन यांनी आज वर्धा जवळील सेवाग्राम इथल्या महात्मा गांधींच्या आश्रमाला भेट दिली. यावेळी जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह, राज्यपालांनी बापू कोटी, बा कुटी, गांधी दफ्तर, पागल दौड आदि निवास आणि इतर कुटींना भेट दिली. तसंच उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी राज्यपालांनी वर्धा इथल्या गांधी चौकातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन केलं.

******

पंतप्रधान-स्वच्छ भारत

निरंतर प्रयत्न करुनच आपण स्वच्छ भारताचं उद्दीष्ट पूर्ण करु शकतो असं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. स्वच्छता ही सेवा अभियानाच्या दशकपूर्ती निमित्त, आज नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गेल्या दहा वर्षात स्वच्छता अभियानात सहभागी झालेले, पुढाकार घेतलेले नेते, नागरीक, धार्मिक तसंच स्वयंसेवी संस्था, खेळाडू, सिने अभिनेते आणि माध्यमांचंही त्यांनी आभार मानले.

इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूट, वॉशिंग्टन, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया आणि ओहीयो स्टेट युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांनी, संयुक्तपणे केलेल्या एका प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये, नुकत्याच झालेल्या अभ्यासाचा दाखला देत मोदी यांनी, स्वच्छ भारत मिशनमुळ, दरवर्षी हजारो मुलांना कसं वाचवलं जात आहे. याबद्दल सांगितलं-

*स्वच्छ भारत मिशन हरवर्ष ६० से ७० हजार बचो का जीवन बचा. सफाई करके, कुडा कचरा हटा के गंदगी मिटाके ६०-७० हजार बच्चे की जिंदगी बचा पाये. इससे बडा परमात्मा का आशीर्वाद क्या हो सकता है. **WHO** के मुताबिक २०१४ और २०१९ तक ३ लाख जीवन बचे है. जो डायरियाके कारण हम खो देते.*

यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते, नऊ हजार ६०० कोटी रुपये किमतीच्या स्वच्छतेशी संबंधित अनेक योजनांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. यात अमृत प्रकल्प स्वच्छ गंगा राष्ट्रीय अभियान आणि गोबरधन योजनेअंतर्गत पंधरा बायोगॅस प्रकल्पांचा समावेश आहे. यावेळी अमृत-दोन योजनेंतर्गत, सातारा पालिकेच्या, स्वयंचलित पाणीपुरवठा प्रकल्पाचं तसंच, नळजोडण्यांना अद्ययावत मीटर बसवण्याच्या कामाचं, मोदी यांनी दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन केलं.

स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी असून, यासाठी प्रत्येकानं कार्यरत राहणं गरजेचं आहे असं, पंतप्रधान यावेळी म्हणाले. या योजना स्वच्छ भारत मिशनला नव्या उंचीवर घेऊन जातील असा विश्वास, पंतप्रधानांनी यावेळी व्यक्त केला.

******

निधी जारी

देशातल्या १४ पूरग्रस्त राज्यांना केंद्रसरकारनं, पाच हजार आठशे पन्नास कोटी रुपयांहून अधिक निधी जारी केला आहे. यात महाराष्ट्राला एक हजार चारशे ९२ कोटी, आंध्र प्रदेशला एक हजार कोटी, गुजरातला ६०० कोटी आणि तेलंगणाला चारशे सतरा कोटी रुपयांचा निधी, मिळाला आहे.

महाराष्ट्राला मिळालेल्या निधीबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं की, महाराष्ट्रानं केंद्र सरकारकडे काही मागितलं की ते लगेचच मिळत, याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यातील शेतकऱ्यांसाठी, १,४९२ कोटींचं पॅकेज जाहीर केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी शेतकऱ्यांचा उल्लेख नेहमीच, अन्नदाता असा करतात. नैसर्गिक आपत्तीच्या काळात विशेष मदत जाहीर करून, त्यांनी आपण कोणत्याही संकटात, शेतकऱ्यांच्या आणि राज्याच्या पाठीशी आहोत हे दाखवून दिले आहे.

******

ई-ड्राइव्ह योजना

देशात इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला, अधिकाधिक चालना मिळत असून, सप्टेंबर महिन्यात, इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी एक लाख ५९ हजाराच्यावर पोहोचली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी, २३ टक्क्यांनी नोंदणी वाढल्याचं, केंद्र सरकारच्या आकडेवारीत म्हटलं आहे.

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत, इलेक्ट्रिक वाहनांची संख्या गेल्या वर्षीच्या तुलनेत, वीस टक्क्यांनी वाढली असून, सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी आठ लाख ९३ हजार इतकी झाली आहे.

याच अनुषंगानं काल नवी दिल्लीत पंतप्रधान ई-ड्राइव्ह योजनेचा प्रारंभ करण्यात आला. देशभरात इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला गती देणं आणि चार्जिंगसाठी, सर्वत्र आवश्यक पायाभूत सुविधा स्थापना करून, स्वच्छ तसंच शाश्वत वाहतुकीला प्रोत्साहन देणं, हे या योजनेचं उद्दिष्ट आहे.

******

स्वच्छ भारत अभियान

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं, दिल्ली-मुंबई, ढोलेरा-अहमदाबाद, तसंच इतर राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीसाठीच्या सामग्रीमध्ये, विलगीकृत कचऱ्याचा कंत्राटदारां

द्वारा रस्ते बांधणीत, वापर करण्यात येत असल्यानं, आतापर्यंत ८० लाख टन कचऱ्याचा, निचरा झाला आहे. त्यामुळ कचऱ्याची विल्हेवाट लागून स्वच्छता अभियानाला हातभार लागत असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज, नागपूरमध्ये केलं.
राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त आज, नागपूर मनपाद्वारे वारसास्थळ असलेल्या, कस्तुरचंद पार्क इथं आयोजित श्रमदान कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमा दरम्यान त्यांनी, कन्वर्झन ऑफ वेस्ट टू वेल्थ या संकल्पनेवर भर देतांना सांगितलं-
*स्वच्छता अभियान उसमे  वायू प्रदूषण, जल प्रदूषण ध्वनी प्रदूषण से अगर मुक्ती मिले तो हमारे ६०-७० पर्सेंट लोगोंको डॉक्टर के पास जाके दावाई लेने कि आवश्यकता नही. शुद्ध पाणी, शुद्ध हवा और उसके साथ पेस्टीसेड और फर्टीलाईझ को न* ***use*** *करते हुए किया हुआ हमारा अनाज, सब्जीया हमारा जीवन बदल सकता है. और इसीलिये गांधीजीने स्वच्छता अभियान हमको दिया और मोदी जी ने इसको बहोत अच्छी तरह से सुरुवात किया. हम लोगो को रिस्पॉन्स बहोत अच्छा मिल रहा है. और हमारी महानगर पालिका मे बहुत अच्छा काम हुआ है टॉयलेट का पाणी बेच कर ३०० करोड साल के कमा रहे हैअभी नेदरलँड कि टेकनॉलॉजी ला कर हमारा लागभग यहा काम सुरु हो गया है. ६ महिने मे २८ टन बायो सीएनजी जो प्लास्टिक है उसको आज रिसायकलिंग के लिये महिला बचत गट को हम दे रहे है. एक प्रकारसे कॉन्वेर्शन  ऑफ वेस्ट तो वेल्थ ये भी भात महापालिका कि तरफ से विशेष रूप से हो रही है.*
केंद्र सरकारच्या स्वच्छ्ता ही सेवा या उपक्रमा अंतर्गत आज, नागपूरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या मुख्यालयात, वॉकथॉनचं आयोजन करण्यात आलं होत. याशिवाय, परमाणू ऊर्जा विभाग, परमाणू खनिज अन्वेषण आणि संशोधन संचालनालयतर्फे ही, सिव्हिल लाईन्स इथं वॉकथॉनचं आयोजन करण्यात आलं. यावेळी अधिकारी, कर्मचारी यांनी, हातात जनजागृतीचे फलक घेत, नागरीकांना स्वच्छ्ता उपक्रमात सहभागी होण्याचं आवाहन करून, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन केलं.
महापालिके तर्फेही संपूर्ण शहरात तब्बल तीन हजार कर्मचाऱ्यांचा सहभागानं स्वच्छ्तेचं कार्य केलं जात आहे. आज, नागपूर आकाशवाणी कार्यालय, तसंच विभागीय आयुक्त कार्यालयात, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती, साजरी करण्यात आली.
दरवर्षी गांधी जयंती पासून सुरू होणाऱ्या लॉयन्स क्लबच्या सेवा सप्ताहाला यंदाही, नागपुरात शांतता रॅलीनं प्रारंभ झाला. लॉयन्स क्लब ऑफ नागपूरच्या वतीनं तयार करण्यात आलेले ई-वेस्ट वाहन हे या रॅलीचं मुख्य आकर्षण ठरलं.

******

ग्राम उन्नत अभियान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज झारखंडमधील हजारीबाग इथं ८३ हजार ३०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी, लोकार्पण आणि उद्घाटन केलं. या प्रकल्पांमध्ये एकूण, ७९ हजार १५० कोटी रुपयांच्या खर्चासह, धरती-आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान आणि पंतप्रधान जनजाती आदिवासी न्याय महाअभियान, अर्थात पीएम-जनमन अंतर्गत, अनेक प्रकल्पांचा समावेश आहे. हजारीबाग इथल्या विनोबा भावे विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमात पंतप्रधानांनी, ४० एकलव्य शाळांचं उद्घाटन आणि २५ एकलव्य शाळांची पायाभरणीही केली.

या महत्त्वाकांक्षी योजनांचा शुभारंभ केल्यानंतर, पाच कोटींहून अधिक आदिवासी लोकांना या योजनांचा लाभ मिळणार असल्याचं, पंतप्रधान म्हणाले. धरती-आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. ज्यात सुमारे ८० हजार कोटी रुपये खर्चून, सुमारे ५५० जिल्ह्यांतील ६३ हजार आदिवासी बहुल गावांचा विकास केला जाणार असल्याचं सांगुन, या योजनेचा उद्देश आदिवासी खेड्यांमध्ये, सर्वांगीण विकासाला चालना देणे, या क्षेत्राच्या सामाजिक-आर्थिक परिदृश्यात, परिवर्तनात्मक बदल घडवून आणणे असल्याचंही, मोदी यांनी यावेळी स्पष्ट केलं.

******

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यानं वर्तवलेल्या अंदाजानुसार, आज नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्याच्या, तुरळ ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून, संपुर्ण पश्चिम विदर्भात आज, अशाच पर्जन्यमानाची शक्यता आहे.

पाच ऑक्टोबर नंतर मात्र, पूर्व विदर्भात वादळी पर्जन्यमान राहू शकत.

******